# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संतोष परचुरे
संचालक


**संदर्भ क्र.-वि.वि.मं. २०२२-२३/०५३** **दिनांक : १४ Sep २०२२**

प्रति ,
मा.प्राचार्य,
जयहिंद कॉम्प्रेहेन्सिव्ह एज्युकेशनल इन्स्टिट्युट
नारायणगांव जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग
कुरण पत्ता: कुरण ता.: जुन्नर जि: पुणे पिनकोड:
410511

महोदय/महोदया,

आपल्या प्रस्तावास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबवण्याबाबत विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणास आपण पाठविलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. या योजनेबाबतच्या स सुधारित नियम व अटींचे पालन करून वरील योजना आपल्या महाविद्यालात दिनांक २९/०७/२०२२ ते माहे फेब्रुवारी २०२३ ह्या दरम्यानच्या कालावधीत राबविणे अपरिहार्य आहे.

योजना कालावधीत शासन व स्थानिक प्रशासनाने कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक उपायांच्या अनुषंगाने जमावबंदी, आंशिक अथवा पूर्ण टाळेबंदी अशा स्वरूपाचे आदेश जारी केल्यास ते आदेश या योजनेच्या अंमलबजावणी, कार्यान्वियनास तत्प्रभावाने लागू असतील व याबाबतीत या विभागाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

योजना कालावधीत शासन व स्थानिक प्रशासनाने कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक उपायांच्या अनुषंगाने जमावबंदी, आंशिक अथवा पूर्ण टाळेबंदी अशा स्वरूपाचे आदेश जारी केल्यास ते आदेश या योजनेच्या अंमलबजावणी, कार्यान्वियनास तत्प्रभावाने लागू असतील व याबाबतीत या विभागाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

योजनेत सहभागी प्रत्येक व सर्व विद्यार्थ्यांना; त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कामाचा मोबदला (प्रति विद्यार्थी प्रति तास रुपये ४५/- याप्रमाणे एका दिवशी जास्तीत-जास्त ३ तासापर्यंतच) काम केलेल्या प्रत्येक महिन्यानंतर त्वरित संबंधित प्रत्येक / सर्व विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्येच जमा करणे अनिवार्य आहे. सदर योजना आपल्या महाविद्यालयात फेब्रुवारी २०२३ अखेर या दरम्यानच्या कालावधीतच राबविणे अनुज्ञेय आहे. या योजनेच्या नियमावलीनुसार प्रत्येक महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थी विकास मंडळाचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये माननीय प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे. (या संयुक्त खात्याचा उपयोग फक्त विद्यार्थी विकास मंडळाकडूनच मंजूर झालेल्या या व इतर सर्व योजनांच्या अनुदानाचे वितरण व खर्च करणेसाठी करावा.)

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी योजनेच्या प्रचलित सर्व नियम व अटींचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्प्रभावी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय/आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणाच्या नियमावलीत न राहता उपक्रमासंबंधी झालेल्या कार्यवाहीचा व वार्षिक लेख्यांचा वार्षिक लेखा परीक्षणाच्यावेळी विचार केला जाणार नाही. कळावे, हि विनंती.

आपला,

संचालक ,
विद्यार्थी विकास मंडळ

भ्रमणध्वनी : ०९२७२७२७९९९, ०८२७५५१५३५४, ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in